Prajapita Brahma Kumaris Ishwariya Vishwa Vidyalaya
19, Narottam Nivas, Near King's Circle Rly. Stn, Mumbai - 400 022
Email: sion.mum@bkivv.org Tel: 2407 3015
HQ: Pandav Bhavan, Mount Abu, Rajasthan www.brahmakumaris.com

PLATINUM JUBILEE 75 1936-2011

ONE GOD ONE WORLD ONE FAMILY

# स्वपरिवर्तनानेच विश्व परिवर्तन शक्य

**- राजयोगीनी रतनमोहिनी दादी**

## ब्रह्माकुमारीज् - एक ईश्वर, एक विश्व, एक परिवाराचे शानदार उदघाटन

मुंबई (दि. ) परिवर्तन ही प्रक्रिया बर्हिगत नसून अंतर्गत आहे. जगातील प्रत्येकास वाटते हा बदलला पाहिजे तो बदलला पाहिजे परंतु जेव्हा स्व परिवर्तन होईल तेव्हाच विश्व परिवर्तनाची कल्पना करणे शक्य आहे. असे प्रतिपादन प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या अमृत महोत्सवा निमित्त एक ईश्वर, एक विश्व, एक परिवार ह्या उपक्रमाचे करतांना विद्यालयाच्या सह-मुख्य प्रशसिका दादी रतनमोहिनीजी यांनी केले.

सायन येथे सोमय्या मैदानावर वसुधैव कुटुम्बकम् ची भावना वृध्दिंगत होण्यासाठी ब्रह्माकुमारीज् तर्फे एक ईश्वर, एक विश्व, एक परिवार उपक्रमाचे आयोजन केले आहे. महाराष्ट्र राज्यस्तरीय कार्यक्रमाचे उद्‌घाटन मुंबई येथे संपन्न झाले. महोत्सवाचे उद्‌घाटन माउण्ट आबू हून आलेल्या ब्रह्माकुमारीज् सह-प्रशासिका दादी रतनमोहिनी, डॉ. भट्टाचार्य, ब्रह्माकुमार बृजमोहन, ब्रह्माकुमारी संतोषदीदी, संस्थेचे मॅनेजिंग ट्रस्टी रमेशभाई शाह, ब्रह्माकुमारी योगीनी बहन, सुप्रसिध्द पार्श्वगायिका साधना सरगम आणि पोस्टल सर्व्हिसच्या डायरेक्टर श्रीमती आभा सिंग यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाद्वारे झाली. ब्रह्माकुमारीज अमृत महोत्सवा निमित्ताने भारतीय डाक विभागद्वारा एक फर्स्ट डे कव्हर प्रकाशित करण्यात आले.

आपल्या मुख्य संबोधनात दादी रतनमाहिनी म्हणाल्या की, समाजात नैतिक, आध्यात्मिक, चारित्रीक मूल्य रूजविणसाठी संपूर्ण जगात ब्रह्माकुमारी कार्य करीत आहे. याद्वारे एक सशक्त मूल्याधिष्ठित समाजाची निर्मिती होण्यास मदत होत आहे. ब्रह्माकुमारी विश्व विद्यालय आपल्या स्थापनेचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करीत असून संपूर्ण जगात अनेकाविध उपक्रम, कार्यक्रमाचे आयोजन केले जात आहे. *एक ईश्वर, एक विश्व, एक परिवार* ह्या उपक्रमाचे आयोजन करीत आहे. जातीभेद, प्रांतभेद, वर्णभेद, भाषिक वाद, देशादेशातील वाढत चालेल्या अविश्वासाच्या दरी या सर्वांना समूळ नष्ट करण्यासाठी सदरहू कार्यक्रमाद्वारे जनजागृती करण्यात येणार आहे. कुठल्याही धर्माचा, पंथाचा मानव एका परमात्म्यावर श्रध्दा ठेवत असेल तर आत्मिक रूपाने सर्व जगातील मानवमात्र हे एका परमात्म्याची लेकरे आहेत आणि एका परिवारातील सदस्य आहेत ही उदात्त भावना आहे.

सुप्रसिध्द हृदयरोग तज्ज्ञ डॉ. भट्टाचार्य यांनी सांगितले की आज जी सर्वत्र तणावग्रस्त आणि अशांत परिस्थिती निर्माण झाली आहे त्यावर एकच उपय - शाळा कॉलेजातून अभ्यासाबरोबर ध्यान योगाचा अभ्यास सुरु करावा. ब्रह्माकुमारी संस्थेबद्दल माझ्या मनात खुप प्रेम आहे. त्या फार नम्र असतात माझ्यासारख्या कइारे

Well-Wishers
Mr. Anil M. Naik
Chairman & M.D., L & T Ltd.
Mr. Samir S. Somaiya
Chairman & M.D.,
Godavari Biorefineries Ltd.
Mr. J. Om Prakash
Veteran Film Producer & Director
Mr. Suresh Oberoi
Noted Film Star
Mr. Arun Gujrati
Ex-Speaker, Maharashtra Legislative Assembly
Mr. Damji Lalji Shah (Anchor),
Industrialist
Bhagwat Acharya Pujyashri
Bhupendrabhai Pandyaji
Mr. Gajendra Singh
Television Director

Prajapita Brahma Kumaris Ishwariya Vishwa Vidyalaya
19, Narottam Nivas, Near King's Circle Rly. Stn, Mumbai - 400 022
Email: sion.mum@bkivv.org Tel: 2407 3015
HQ: Pandav Bhavan, Mount Abu, Rajasthan www.brahmakumaris.com

PLATINUM JUBILEE 75 1936-2011

ONE GOD ONE WORLD ONE FAMILY

हृदयाचा व्यक्ति देखील त्यांच्यापुढे नम्र होतो. त्यांचे मेडिटेशन मला फार आवडते. क्लिअर-क्लिन विचारांचा प्रवाह म्हणजे मेडिटेशन होय. यामुळे तन आणि मन दोन्ही शुदघ होतात

सुप्रसिद्ध गायिका साधना सरगम यांनी ज्योत से ज्योत जगाते चलो प्रेम की गंगा बहाते चलो या कर्णमधूर गीताने महोत्सवाची शान वाढविली. यानिमित्त महाराष्ट्र-आंध्र प्रदेशच्या क्षेत्रिय निर्देशिका ब्रह्माकुमारी संतोष दीदी, ब्रह्माकुमार बृजमोहन, ब्रह्माकुमारी संतोषदीदी, संस्थेचे मॅनेजिंग ट्रस्टी रमेशभाई शाह, ब्रह्माकुमारी योगीनी बहन, सुप्रसिद्ध पार्श्वगायिका साधना सरगम आणि पोस्टल सर्व्हिसच्या डायरेक्टर श्रीमती आभा सिंग यांचीही समयोचित भाषणे झालीत.

या महोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे संस्थेच्या मुख्य प्रशसिका ९५ **वर्षीय राजयोगिनी दादी जानकीजी** यांची प्रेरणादायी उपस्थिती होय. जगातील सर्वात स्थिर मनाच्या महिल्या म्हणून ख्याती असलेल्या दादीजी आपल्या अमृतवाणीने उपस्थितांना मनाच्या ख-या शांतीची अनुभूति करवितात. या कार्यक्रमात आस्था वाहिनीवरील अवेकिंग विथ ब्रह्माकुमारीज् कार्यक्रमाच्या व्याख्यात्या ब्र.कु. शिवानी बहन यांच्या प्रवचनाबरोबर माऊंट आबू येथील ब्रह्माकुमारी उषा बहनजी यांचे राजयोग गीता प्रवचनांचेही आयोजन होणार आहे. सदर उपक्रमाची सविस्तर माहिती ब्रह्माकुमारीज् चे हिंदी संकेतस्थळ बीकेवार्ता.कॉम (www.bkvarta.com) यावर उपलब्ध आहे.

मा. संपादक,

दै. कृपया उपरोक्त वत्त आपल्या लोकप्रिय दैनिकातून मानवमात्रांच्या कल्याणासाठी प्रसिद्ध करावे.

**फोटो कॅप्शन -**
मुंबई - एक ईश्वर, एक विश्व, एक परिवार महोत्सवाचे उद्‌घाटन करतांना ब्रह्माकुमारीज् सह-प्रशासिका दादी रतनमोहिनी, डॉ. भट्टाचाग्र, ब्रह्माकुमार बृजमोहन, ब्रह्माकुमारी संतोषदीदी, संस्थेचे मॅनेजिंग ट्रस्टी रमेशभाई शाह, ब्रह्माकुमारी योगीनी बहन, सुप्रसिद्ध पार्श्वगायिका साधना सरगम आणि पोस्टल सर्व्हिसच्या डायरेक्टर श्रीमती आभा सिंग

Well-Wishers
Mr. Anil M. Naik
Chairman & M.D., L & T Ltd.
Mr. Samir S. Somaiya
Chairman & M.D.,
Godavari Biorefineries Ltd.
Mr. J. Om Prakash
Veteran Film Producer & Director
Mr. Suresh Oberoi
Noted Film Star
Mr. Arun Gujrati
Ex-Speaker, Maharashtra Legislative Assembly
Mr. Damji Lalji Shah (Anchor),
Industrialist
Bhagwat Acharya Pujyashri
Bhupendrabhai Pandyaji
Mr. Gajendra Singh
Television Director